साप्राव नोंदणी शाखा
आयुक्त -
अ.शा.पत्र -
21 DEC 2000
पु.का.अ.

जिल्हा ग्राम विकास निधीच्या
गुंतवणुकीबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
परिपत्रक क्र. व्हीपीएम २६००/प्र.क्र.१०७१/२२
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक - २२ नोव्हेंबर २०००

वाचा :- क्र. व्हीपीएम २६९९/प्र.क्र.१०७१/२२ दि. १८.११.१९९९

**परिपत्रक** -

मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६० मध्ये अशी तरतूद आहे की, स्थायी समितीने वेळोवेळी ग्राम पंचायतींना कर्ज देण्यासाठी किंवा ग्राम पंचायतींनी दिलेल्या अंशदानाच्या रकमावरील व्याज देण्यासाठी ताबडतोब आवश्यक नसेल तेवढी रक्कम राज्य सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या तारणपत्रामध्ये किंवा याबाबतीत राज्य शासन मान्यता देईल अशा तारणामध्ये गुंतवील्या पाहिजेत आणि तशाच स्वरुपाच्या इतर गुंतवणुकीकरीता अशा गुंतवणूकी बदलल्या पाहिजेत आणि तारणपत्रापासून मिळणारे उत्पन्न आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न सदर निधीत परत जमा केले पाहिजे. परंतु महालेखाकार मुंबई यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की काही जिल्हयामध्ये ग्राम निधीमधील रक्कमा मोठया प्रमाणावर करंट अकाऊंट मध्ये विना वापर पडलेल्या असून संबंधित जिल्हा परिषदेला याबाबत समाधानकारक खुलासा करता आलेला नाही.

जिल्हा ग्राम विकास निधीमधील रक्कम विनावापर पडून न रहाता त्याची योग्य
प्रकारे गुंतवणूक होऊन त्यापासून व्याजव्दारे उत्पन्नात वाढ झाल्यास शेवटच्या
स्तरावरील पंचायत राज संस्था आर्थिक दृष्टया बळकट होण्यास हातभार लागणार
आहे. व यामुळे स्थानिक स्तरावरील आर्थिक व प्रशासकीय समस्या सुटण्यास मदत
होईल.या हेतूनेच शासनाने दि. १८.११.९९ च्या परिपत्रकान्वये या निधीतील रक्कम
काही प्रमाणात इतर शासन/शासन मान्यता तारणामध्ये गुंतविण्याच्या सूचना दिल्या
होत्या.मात्र त्याची काटेकोर अंमलबजावणी झाल्याचे आढळत नाही यासाठी मुंबई ग्राम
विकास निधी नियम १९६० मधील निकर्ष लक्षात घेऊन तसेच शासनाच्या सूचना लक्षात
घेऊन सदर निधीमधील रकमा विनावापर न ठेवता सदर रकमाची योग्य प्रकारे
गुतंवणूक होईल याचा अग्रक्रमाने विचार व्हावा तसेच मागील तीन वर्षाच्या सरासरी
withdrawls च्या दीडपटापेक्षा जास्त रक्कम ( current accounts) मध्ये राहणार
नाही याची सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. मात्र अजूनही काही

जिल्हा परिषदेमध्ये सदर गुंतवणूकीबाबत योग्य ती खबरदारी न घेतल्यामुळे महालेखाकार (लेखापरिक्षा) मुंबई यांनी पुन्हा एकदा याबाबत आक्षेप घेतले आहेत. यास्तव शासन परिपत्रकातील उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी पुरेपुर काळजी घ्यावी. अशा सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( कुंदा गोसावी )
शासनाचे उपसचिव

प्रत,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

Scanned with OKEN Scanner